Gokhale Education Society's

**SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik.**

## EVENT REPORT FORMAT

| | |
|---|---|
| Name of the Programme | मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन |
| Day and Date | शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४ |
| Organising Committee/Department (Mention Collaborating Agency) | मराठी विभाग |
| Time | स. १०.३० ते १२.०० |
| Topic /Theme | मराठी भाषेचे जतन व संवर्धन |
| Resource Person/s | प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर |
| Students attended the Programme | ६० |
| Brief Summary | शनिवार दि. १० ऑगस्ट २०२४ रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन प्राचार्या डॉ. सौ. संध्या खेडेकर यांच्या हस्ते संपन्न झाले. विद्यार्थिनींनी सजवलेल्या विविध नामवंत साहित्यिकांच्या रचनांच्या भित्तीफलकाचे अनावरण डॉ. संध्या खेडेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या आरंभी कु. गौतमी वाघ हिने ईशस्तवन सादर केले. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन व सरस्वती पूजन झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत डॉ. सायली आचार्य यांनी केले. मान्यवरांचा परिचय विद्यार्थिनी सौ. सविता देसले हिने करून दिला. मराठी भाषेचे सौंदर्य अमाप आहे. इतर भाषांमधून विविध शब्द स्वीकारत तसेच सावरकरांनी जसे दिनांक सारखे शब्द मराठी भाषेला दिले अशा नवीन शब्दांना कवेत घेत मराठी भाषा आणि त्यातील समृद्ध वाङ्मयाचा वारसा आपल्याला लाभला आहे याविषयी आनंद व्यक्त केला. छत्रपती शिवरायांनी करवून घेतलेल्या राज्यव्यवहारकोशापासून ते कवी मोरोपंतांच्या सुभग रचनांची उदाहरणे त्यांनी यावेळी दिली. कला शाखेचे समन्वयक पं. डॉ. अविराज तायडे यांनी डॉ. संध्या खेडेकर यांचा सत्कार ग्रंथभेट व रोप देऊन केला. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर, पं. डॉ. अविराज तायडे उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थिनींना नवीन शैक्षणिक धोरणानुसार आलेल्या नव्या अभ्यासक्रमासंदर्भात माहिती देण्यात येऊन एक लघुचित्रपट दाखविण्यात आला व त्यावर विद्यार्थिनी संवाद घडवून आणण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. केतकी नगरकर व मोहिनी गंधे यांनी केले तर आभार कु. ईशू यादव हिने मानले. |
| Signature of the Committee In-charge/ HOD | 30/8/24 Committee In-charge     Principal |

| | |
|---|---|
| (Attach Photograph) |  <br>मराठी वाङ्मय मंडळाच्या भित्तिफलकाचे अनावरणप्रसंगी प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, डॉ. सायली आचार्य, प्रा. छाया लोखंडे, प्रा. मनिषा जोशी, प्रा. अर्चना साळुंखे, प्रा. गीतांजली गिते, श्री. नितीन वारे, श्री. ज्ञानेश्वर कासार, सौ. मधुरा जोशी व सौ. हेमा देशमुख<br> <br>मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्या डॉ. सौ. संध्या खेडेकर<br> <br>विद्यार्थिनींना 'एक कदम' नामक स्त्रीचे आत्मभान जागे करणारी लघुचित्रफीत दाखविण्यात आली. त्यावर विद्यार्थिनी संवाद घडवून आणण्यात आला. |




मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन विविध साहित्यिकांच्या रचना असलेल्या भित्तिफलकाचे अनावरण करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर समवेत डॉ. सायली आचार्य, प्रा. छाया लोखंडे, श्री. नितीन वारे आणि श्री. ज्ञानेश्वर कासार